पोलीस उप अधीक्षक कार्यालय,
अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, जालना
दुरध्वनी क्रमांक ०२४८२ –२२०२५२ टोल फ्री क्रमांक –१०६४
dysp.acbjalna@mahapolice.gov.in.
dyspacbjalana@gmail.com

**प्रेस नोट** दि. २८.०५.२०२४

**महात्मा गांधी रोजगार हमी योजनेव्दारे मंजुर विहीर बांधकांमाचे मश्टर मंजुर करुन देण्यासाठी २,५०० लाचेची रक्कम स्विकारतांना रोजगार सेवकास अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, जालनाचे पथकाने पकडले.**

| | | |
|---|---|---|
| आलोसे यांचे नाव | – | भाउसाहेब काशिनाथ गिराम वय ४८ वर्ष पद – रोजगार सेवक, ग्रामपंचायत कार्यालय, राममुर्ती ता. जि जालना रा. मारुती मंदीराजवळ, राममुर्ती ता.जि. जालना ( कंत्राटी ) |
| गुन्हा घ ता वेळ ठिकाण | – | दि. २८.०५.२०२४ रोजी पंचायत समिती कार्यालय, जालना जि. जालना येथे. |
| लाचेची रक्कम | – | २,५०० रुपये. |

तक्रारदार यांची मौजे राममुर्ती शिवारात गट क्रं १८० मध्ये ४० आर जमीन आहे. सदर शेत जमीनीवर त्यांना शासनाच्या महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत विहीर मंजुर झालेली असुन त्यांचेकडे स्वत जॉब कार्ड धारक आहे. सदर विहीरीचे चालु महिन्याचे बांधकामाचे मश्टर घेण्यासाठी तक्रारदार हे आरोपी भाउसाहेब गिराम, रोजगार सेवक यांचेकडे गेले असता भाउसाहेब गिराम याने मश्टर देण्यासाठी मला ५,०० रुपये व इंजिनिअर रत्नपारखे यांचेसाठी २,००० रुपये दयावे लागतील, असे म्हणुन तक्रारदार यांचेकडे २,५०० रुपये लाचेची मागणी केली, परंतु तक्रारदार यांची त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, जालना यांचेकडे तक्रार केली.

सदर तक्रारीवरुन दिनांक २७.०५.२०२४ रोजी आरोपी यांचे लाच मागणीबाबत पडताळणी केली असता आरोपी भाउसाहेब गिराम, रोजगार सेवक याने तक्रारदार यांना त्यांचे विहीर बांधकामाचे चालु महिन्याचे मश्टर देण्यासाठी पंचासमक्ष स्वतचे ५०० रुपये आणि इंजिनियर रत्नपारखे यांचेसाठी २,००० रुपये असे मिळुन २,५०० रुपये दयावे लागतील, असे म्हणुन लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पण्ण झाले, त्यावरुन आज दि. २८.०५.२०२४ रोजी सापळा लावला असता आरोपी भाउसाहेब गिराम याने तक्रारदार यांचे विहीर बांधकामाचे चालु महिन्याचे मश्टर देण्यासाठी स्वतचे ५०० रुपये आणि इंजिनिअर रत्नपारखे यांचेसाठीचे २,००० रुपये माझेकडेच दयावे लागेल, असे सांगुन तक्रारदार यांचेकडुन २,५०० रुपये लाचेची रक्कम पंचासमक्ष स्विकारली असता त्यांना पंचायत समिती कार्यालय, जालना येथे लाचेच्या रक्कमेसह अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, जालनाचे पथकाने रंगेहाथ पकडले आहे.

आरोपी नामे भाउसाहेब काशिनाथ गिराम वय ४८ वर्ष पद – रोजगार सेवक, ग्रामपंचायत कार्यालय, राममुर्ती ता. जि जालना रा. मारुती मंदीराजवळ, राममुर्ती ता.जि. जालना ( कंत्राटी ) यांचेविरुध्द पोलीस ठाणे कदीम जालना जि जालना येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे.

**तसेच अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, जालना यांचे कडुन आवाहन करण्यात येते कि, कोणी लोकसेवक स्वत अगर इतरांमार्फत शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खासगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास ०२४८२ – २२०२५२, तसेच टोल फ्री क्रं १०६४ वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक, जालना मो.नं.९०११११२५५५३ व dysp.acbjalna@mahapolice.gov.in आणि dyspacbjalana_@gmail.com वर संपर्क करावा.**

(किरण [illegible].बिडवे)
पोलीस उप-अधीक्षक
अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, जालना